# भुयारी स्थानके सुरळीत मार्गी

## मेट्रो ३वरील सीप्झ, एमआयडीसी, मरोळ नाका पूर्णत्वास

म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई :** सीप्झ-वांद्रे-कुलाबा या मेट्रो ३ मार्गिकेसाठी डिसेंबरची डेडलाइन ठरलेली आहे. त्यासाठी सात महिने शिल्लक असताना या मार्गिकेवरील सीप्झ, एमआयडीसी व मरोळ नाका या महत्त्वाच्या स्थानकांचे पूर्ण झाले आहे. वारसा इमारती, कार्यालये आणि गजबजलेल्या ठिकाणी ही स्थानके जमिनीखाली उभारण्यात आली आहेत. जमिनीवर असलेल्या इमारती, कारखाने, कार्यालये आणि रहिवाशांना कोणत्याही प्रकारचा त्रास न होता उभारलेली ही स्थानके म्हणजे अभियांत्रिकी कौशल्याचा आविष्कार मानला जात आहे.

### सीप्झ

- विविध कंपन्यांची कार्यालये या स्थानकावरील परिसरात आहेत.
- स्थानकाचे बांधकाम ९७.२० टक्के व प्रणालीशी निगडित ८५.७० कामे टक्के पूर्ण झाले आहे.

### एमआयडीसी

- हे स्थानक विविध लहान-मोठ्या कारखान्यांच्या खाली आहे.
- स्थानकाचे बांधकाम ९८ टक्के व प्रणालीशी संबंधित ८६.४० कामे टक्के पूर्ण झाली आहेत.

### मरोळ नाका

- कायम वर्दळीच्या व वाहतूककोंडीचा सामना या स्थानकावरील भागात करावा लागतो.
- स्थानकाचे बांधकाम ९४.३० टक्के आणि प्रणालीशी संबंधित ७०.८० टक्के कामे पूर्ण झाली आहेत.



मेट्रो ३ हा राज्यातील पहिला भूमिगत मेट्रो प्रकल्प आहे. देशात अन्य ठिकाणीही भूमिगत मेट्रो प्रकल्प पूर्ण झाले आहेत. त्यामध्ये दिल्ली मेट्रोचे काम आव्हानात्मक असल्याचा उल्लेख आवर्जून केला जातो. मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडणारी मेट्रो ३ या मार्गिकेचे काम आव्हानात्मक ठरले आहे. हे काम ही मार्गिका उभ्या करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून (एमएमआरसी) झपाट्याने पूर्ण होत आहे. या मेट्रो मार्गिकेवरील काही स्थानके ही हेरिटेज इमारतींच्या खाली आहेत. तसेच पहिल्या टप्प्यातील पहिली तीन स्थानके ही अत्यंत वर्दळीच्या भागांत उभारण्यात आली आहेत.